# शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, उत्तर विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,

नवीन प्रशासकीय इमारत, बिल्डिंग नं.२, दुसरा मजला, आर. सी.मार्ग , चेंबूर (पूर्व) मुंबई -४०० ०७१.
दूरध्वनी क्र. ०२२-२५२८६०५७ / २५२२६८२८ Email ID - ssaeinorth@yahoo.co.in, rmseinorth@gmail.com


क्र.शिनि/उवि/माध्य- /२०२०/ 3416
दिनांक : 20/11/2020

प्रति,

मुख्याध्यापक,/मुख्याध्यापिका,
सर्व अनुदानित / विना अनुदानित
कायम विना अनुदानित,/ स्वयंअर्थ सहाय्यित शाळा

**विषय : बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या सर्व प्रकारच्या शाळा दि.३१.१२.२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत.**

**संदर्भ** : १) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.१४०/एसडी-६, दि.१०.११.२०२०.
२) मा.शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई, महानगर पालिका यांचे पत्र क्र.ईओजी/१५९५ दि.२०.११.२०२०

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये दि.२३.११.२०२० पासुन इ.९ वी ते १२ वी चे वर्ग सुरु करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोरोना तथापि बृहन्मुंबई महानगर पालिका क्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव नियंत्रणात असला तरी अन्य देशामध्ये कोरोना विषाणूची आलेली दूसरी लाट व अन्य राज्यातील कोरोनाची परिस्थिती पाहता सदर कोरोना विषाणूची दूसरी लाट आपल्या देशामध्ये व आपल्या राज्यामध्ये येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच पूढील ०४ ते ०६ आठवडे कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी विशेष काळजी घेण्याची आवश्यकता असल्याने इ.९ वी ते १२ वी च्या शाळा दि.२३.११.२०२० पासून सुरु न करता खबरदारीचा उपाय म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व मंडळाच्या शाळा/उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी दि.३१.१२.२०२० पर्यंत बंद ठेवण्यास मा. मनपा आयुक्तांच्या आदेशान्वये खालील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. **विभागातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या माध्यमिक शाळा विद्यार्थ्यांसाठी दि.३१.१२.२०२० पर्यंत बंद ठेवण्यात येत आहेत.**
२. **महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य., परिक्षा मंडळाच्या पूर्व नियोजित सुरु असणाऱ्या इ.१० वी व १२ वी च्या पुरवणी परिक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार सुरु राहतील.**

वरील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. व त्याचे काटेकोर पालन होईल याची दक्षता घ्यावी.

(डॉ.मुश्ताक शेख)
शिक्षण निरीक्षक,
बृहन्मुंबई,उत्तर विभाग